
# हे वाचलं का?

रसिक वाचक मित्रहो !
सातत्याने बाजारात इतकी नवी पुस्तके येत असतात, की पुस्तक पेठेत आल्यावर नेमके कोणते पुस्तक घ्यावे तेच उमजत नाही. म्हणूनच आम्ही अधून मधून काही खास नव्या पुस्तकांची शिफारस करून माहिती देत असतो – ‘हे वाचलं का?’ या सदरात. तर याच सदरात आज नव्याने आलेल्या दहा उत्तम पुस्तकांची माहिती देत आहोत.
जरूर खरेदी करून वाचा ही पुस्तके !

## 1. पुस्तकाचे नाव : युगंधर शिवराय - नियोजन आणि व्यवस्थापनाचे दीपस्तंभ

**लेखक : डॉ. सुमंत दत्ता टेकाडे / संपादक: डॉ. श्याम माधव धोंड**

**किंमत : 600/-** **विशेष सवलतीत : 450/-**




छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे युगनिर्माते राष्ट्रपुरुष ! महाराष्ट्राचे भाग्यविधाते ! तमाम मराठी मनांचे मानबिंदू ! 'युगंधर शिवराय'मधून डॉ. सुमंत टेकाडे यांनी शिवरायांचे स्वराज्य निर्मितीमागील प्रभावी नियोजन व यशस्वी व्यवस्थापन यांचा अभ्यासपूर्ण वेध घेतला आहे. शिवप्रभूचे दूरदर्शी नेतृत्व, असामान्य कर्तृत्व आणि अद्भुत नेटवर्किंग यांचीही मार्मिक उकल केली आहे. राजांची चाकोरीबाहेरचा विचार करण्याची वृत्ती (आऊट ऑफ द बॉक्स थिंकिंग) आणि जोखीम पत्करण्याची क्षमता (रिस्क टेकिंग ॲबिलिटी) याचाही लेखकाने विशेष परामर्श घेतला आहे.

महाराजांचे माणसे पारखण्याचे कौशल्य तसेच विपरीत काळातही संतुलन व मनोबल राखण्याचे धैर्य, यांसारख्या त्यांच्या विविध गुणवैशिष्ट्यांचे दर्शन या पुस्तकातून घडते.

शिवाजीराजांची राजनीती, युद्धनीती व अर्थनीती तद्वतच, त्यांची स्वराज्यसंकल्पना व परराष्ट्रधोरण यांचा डॉ. सुमंत टेकाडे यांनी 'नियोजन आणि व्यवस्थापनाचे दीपस्तंभ *'युगंधर शिवराय'* मधून कालोचित वेध घेतला आहे.


शिवरायांच्या गुणविशेषांची आजच्या काळाशी लेखकाने घातलेली सांगड अत्यंत उद्बोधक आहे. त्यामुळे हे पुस्तक विविध क्षेत्रांतील कार्यरत व्यक्ती, विद्यार्थी आणि संस्थांसाठीही प्रेरक आणि मार्गदर्शक झाले आहे. प्रत्येक शिवप्रेमींनी जवळ बाळगावे, असेच हे पुस्तक आहे.

*-शिवकथाकार विजयराव देशमुख*

## 2. पुस्तकाचे नाव : माणिक मोती – माणिक वर्मा आणि परिवार


**लेखक : शोभा बोंद्रे**

**किंमत : 400/-** **विशेष सवलतीत : 300/-**




'माणिक वर्मा' असे नाव उच्चारले की,
कानामनात रुणझुणू लागतात ,असंख्य भावगीते, भक्तिगीते अन् नाट्यगीते.
शास्त्रीय संगीतातही आपले वेगळे वैशिष्ट्यपूर्ण स्थान त्यांनी निर्माण केले होते.
संगीतक्षेत्रात त्यांनी जशी लखलखती कारकीर्द साकारली, तसाच स्वतंत्र ठसा वर्मा कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने आपापल्या कार्यक्षेत्रात उमटवला.
माणिकताईंचे पती अमर वर्मा हिंदी आणि उर्दूचे ख्यातकीर्त शायर.
दोन कन्या - भारती आचरेकर अन् वंदना गुप्ते सुप्रसिद्ध अभिनेत्री,
तर तिसरी कन्या राणी वर्मा नामवंत गायिका.
चौथी कन्या अरुणा जयप्रकाश नामांकित फिजिओथेरपिस्ट.
संपूर्ण वर्मा परिवार म्हणजे जणू विविध कलाक्षेत्रांमध्ये लाखो रसिकांच्या हृदयात अढळ स्थान मिळवणारी अनमोल रत्ने.
माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त या समग्र परिवाराच्या कलाकर्तृत्वाचा वेध घेणाऱ्या स्मृतिचित्रांचा वेधक शब्दपट -

## 3. पुस्तकाचे नाव : विकासाच्या वाटेवर...-आव्हाने आणि उपाययोजना





**लेखक : गुरुदास नूलकर**

**किंमत : 190/-** **विशेष सवलतीत : 150/-**

भारताला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे झाली, देशाचे राष्ट्रीय सकल उत्पन्न 3 ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचले; पण अनेक सामाजिक समस्यांमधून देशाची सुटका झालेली नाही. 'उपभोगातून वाढ' या तत्त्वावर आर्थिक वृद्धी उभी आहे; पण यातू अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. हवा, पाणी आणि जमिनीचे प्रदूषण वाढले आहे, जंगले, खनिजे आणि पाणी या साधनसंपत्तींचा अतिवापर पर्यावरणाला नुकसान पोहोचवत आहे. आणि परिणामी समाजस्वास्थ्य बिघडत चालले आहे. भारताची वाढती बाजारमागणी आणि आर्थिक क्रियाकलाप नैसर्गिक साधनसंपत्तींवर अतोनात दबाव आणत आहेत. वीजनिर्मिती आणि वाहतुकीसाठी भारत इंधनावर अवलंबून असल्याने हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

या पुस्तकात **गुरुदास नूलकर** यांनी काही दुर्लक्षित समस्यांवर अभ्यासपूर्ण ऊहापोह केला आहे. त्यांचा परिणाम विषमत आणि पर्यावरणीय हासावर कसा होतो याची मांडणी करीत लेखकाने त्यावर उपाययोजना सुचविल्या आहेत.
***प्रा. माधव गाडगीळ यांनी प्रस्तावनेतून एका मोठ्या समस्येवर विस्तृत विवेचन केले आहे.***

## 4. पुस्तकाचे नाव : स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर




**लेखक : तारा भवाळकर**

**किंमत : 250/-** **विशेष सवलतीत : 190/-**

स्त्रीमनातील न्यूनगंडभाव आणि पुरुषमनातील अहंगंडभाव हे दोन्ही स्त्रीलाच नव्हे तर पुरुषालाही जीवनातला आनंद अन् समाधान मुक्तपणे घेऊ देत नाहीत. स्त्रीमुक्तीचा प्रश्न हा केवळ स्त्रीचा नसून तो समग्र मानवजातीच्या निरामयतेचा, स्वास्थ्याचा प्रश्न आहे. स्त्रीमुक्ती म्हणजे पुरुषविरोध नव्हेच नव्हे, असलेच तर ते पुरुष साहाय्यच आहे. एकूण मानवमुक्तीच्या वाटेवरचा स्त्रीमुक्ती हा एक टप्पा आहे, अशा विचाराप्रत स्त्रीवादी अभ्यासक येत आहेत.
गेल्या दोन-अडीचशे वर्षांत भौतिक प्रगतीने प्रचंड वेग घेतला आहे आणि मध्ययुगीन कष्टप्रद जीवनसंघर्षातून माणसाला खूपसे भौतिक स्वास्थ्य दिले आहे. असे असले तरी मानवी जीवन खऱ्या अर्थाने सुखी-समाधानी झाले आहे असे दिसत नाही. उलट वस्तुरूप समृद्धीच्या माऱ्याने नवीन अस्वस्थता निर्माण होत आहे.
अशा वेळी संताचे मुक्तिआंदोलन आणि विशेषतः मराठी संत स्त्रियांची भक्तिक्षेत्रातील मुक्तिआंदोलनाची भूमिका येथील सांस्कृतिक पर्यावरणात तपासून पाहण्याचा प्रस्तुत प्रयत्न आहे. संत स्त्रियांच्या आध्यात्मिक मुक्तिकल्पनेचा आणि प्रत्यक्ष जीवनसंघर्षाचा आजच्या स्त्रीमुक्ती संदर्भात काही संबंध आहे का हे शोधण्याचा प्रस्तुत लेखन हा एक नम्र प्रयत्न आहे.

## 5. पुस्तकाचे नाव : फ्योदर मिखायलविचचे चार मृत्यू आणि एक पुनरुत्थान




**लेखक : झोरान झिवकोविच / भाषांतर : अभिषेक धनगर**

**किंमत : 260/-** **विशेष सवलतीत : 200/-**

फ्योदर मिखायलविचचे चार मृत्यू आणि एक पुनरुत्थान' ह्या कादंबरीत धुक्यानं भरलेल्या उद्यानात दोन हुबेहूब दिसणाऱ्यांची अचानक होणारी भेट, आगगाडीच्या रेस्टॉरन्ट कारमध्ये विचित्रपणे झालेला एका प्रवाशाचा मृत्यू, एका मानसशास्त्रज्ञानं अतिशय असाधारण पेशंटशी केलेली गमतीदार परंतु शोकात्म सल्लामसलत, तुर्की स्नानगृहात होणारा एका अदृश्य व्यक्तीचा आणि कफल्लक झालेल्या जुगाऱ्याचा संवाद अशा चार प्रकरणांमध्ये सामायिक असलेली गोष्ट म्हणजे त्यातलं अतिशय प्रतिभावान, प्रसिद्ध परंतु परिस्थितीनं गांजलेलं मुख्य पात्र. हे पात्र म्हणजे 'क्राईम अँड पनिशमेंट, 'द इडियट, 'डीमन्स' आणि 'द ब्रदर्स कारमाझफ' या कादंबऱ्यांचा लेखक फ्योदर मिखायलविच दस्तईव्स्की. झिवकोविच नेहमीच्या वाटणाऱ्या घटनांमध्ये समांतर वास्तव उभं करतात. खुनी थरारनाट्य, कृत्रिम बुद्धिमत्तेसारखे


भविष्यवर्ती चमत्कार अशा आशयसूत्रांमधून दस्तईव्स्कीसारख्या थोर लेखकाचं मरण आणि पुनरुत्थान झिवकोविच अनोख्या विश्वात आणि अनोख्या रीतीनं उभं करतात.

***-गणेश विसपुते***

## 6. पुस्तकाचे नाव : डेट विथ देवदास

**लेखक : योजना यादव**

**किंमत : 260/-** **विशेष सवलतीत : 200/-**




तुझ्या कथा काही वर्षांपूर्वी वाचल्या असत्या तर माझ्याच आयुष्यातील काही गोष्टी अधिक उमदेपणाने निभावून नेता आल्या असत्या, काही निसटून गेलेल्या गोष्टी कदाचित थांबवता आल्या असत्या असं वाटलं.


हे मी योजनाच्या कथा वाचल्यानंतर तिला कळवलं. तिच्या कथा वाचून मला तसं मनापासून वाटलं होतं. अर्थात ह्या कथा काही अशा उद्देशाने लिहिलेल्या नाहीत हे उघड आहे. पण त्या आपल्या सभोवतालच्या वर्तमानातल्या ज्या घोंगावणाऱ्या वादळात आपण डोळे मिटून उभे आहोत, त्या वादळाचं आतून दर्शन घ्यायला भाग पाडतात.

कुणाला ह्या नातेसंबंधांच्या पडझडीच्या कथा वाटतील. कुणाला त्या नव्या नातेसंबंधांच्या नवनिर्मितीच्या कथा वाटतील. पडझड काय किंवा नवनिर्मिती काय, दोन्हींचा वास्तुविन्यास मात्र सारखाच आहे. त्या विन्यासातून ह्या कथा तुमचं बोट धरून फिरवतील. मग ती पडझड आहे की नवनिर्मिती आहे, हे ज्याच्यात्याच्यावर सोपवलेलं. पडझड आणि नवनिर्मिती ह्या दोन्हींच्या मधला प्रदेश नेहमीच ओसाड असतो. त्या ओसाडभूमीवरून ह्या कथा वाचताना पडझडपूर्व आणि निर्मितीपश्चात अशी दोन्ही जगं वाचक म्हणून मला पाहता आली. आणि एक चिमूटभर सत्य हाताला लागलं. त्याचं श्रेय ह्या कथांमधील जिवंतपणाला, उमदेपणाला, नीडरपणाला आणि स्वच्छ करारी दृष्टीला.

***- अभिषेक धनगर***

## 7. पुस्तकाचे नाव : भारत – सत्य - सत्व – स्वत्व


**लेखक : अभिजीत जोग**




**किंमत : 499/-** **विशेष सवलतीत : 375/-**

भारत हा जगातील एकमेव देश असेल ज्याची खरी ओळख पुसून टाकण्यासाठी एक राष्ट्र म्हणून त्याचं अस्तित्वच नाकारण्यात आलं. शिक्षण आणि इतिहास या त्याच्या शक्तिस्थानांवर हल्ला करून त्याचा आत्मविश्वास आणि आत्मसन्मान नष्ट करण्यात आला. कधीच लयाला गेलेल्या आणि संग्रहालयापुरत्या उरलेल्या इतर प्राचीन संस्कृतींचं वारेमाप गुणवर्णन करण्यात साम्राज्यवादी शक्तींना कुठलीही अडचण वाटली नाही. पण हजारो वर्षांपासून आजही जिवंत असलेल्या भारतीय संस्कृतीचं महत्व मान्य करणं निरंकुशतावादी शक्तींसाठी गैरसोयीचं होतं. राजकीय स्वातंत्र्य मिळालं तरी या शक्तींनी लादलेल्या वसाहतवादी मानसिकतेतून भारतीयांची अजूनही पूर्णपणे मुक्तता झालेली नाही. न्यूनगंड, आत्मनिंदा यांचा प्रभाव अजूनही ओसरलेला नाही. कारण भारतीयांना आपली खरी ओळख अजूनही गवसलेली नाही.

'सभ्यता' या शब्दाचा अर्थ जगाला समजावणारा; भाषा आणि संस्कृतीची देणगी जगाला देणारा; विविध ज्ञानशाखांची पायाभरणी करणारा; गळेकापू स्पर्धेशिवायही समृद्धीची निर्मिती करता येते हे दाखवून देणारा; वैश्विक मानवी मूल्यांचा संदेश देणारा; अराजक, अस्थैर्य, असहायता यांच्या गर्तेत सापडलेल्या जगाला स्थैर्य, शांती, समृद्धी, सर्वसमावेशकता यांचा मार्ग दाखविण्याची क्षमता असलेला देश, ही भारताची खरी ओळख भारतीयांनाच करून देणे अत्यावश्यक आहे. वसाहतवादी मानसिकता झुगारून दिलेला, आपली खरी ओळख पटलेला, आपल्या सुप्त क्षमतांची जाणीव झालेला भारतच जगाला मार्ग दाखविण्याची आपली ऐतिहासिक जबाबदारी पार पाडण्यास सिद्ध होऊ शकेल.




**8. पुस्तकाचे नाव : पाळंमुळं (हेरकुन्फ्ट या जर्मन कादंबरीचं भाषांतर )**

**लेखक : साशा स्टानिसिच / जयश्री हरि जोशी**

**किंमत : 500/-** **विशेष सवलतीत : 375/-**

आपलं जन्मस्थान, तिथे रुजत गेलेली पाळंमुळं, राजकीय उलथापालथ झाल्यामुळे मायभूमी सोडून केलेलं पलायन आणि दुसऱ्या भूमीशी नाळ जोडून घेतानाचा प्रवास ह्या विस्तीर्ण पटलावर साशा स्टानिसिचची लेखणी लीलया वावरते.

ह्या पुस्तकात कादंबरी, आत्मकथन, स्मृतींचे आरेखन, दस्तावेजीकरण आणि कल्पनाशक्तीचा अद्भुत खेळ ह्या अनोन्याश्रयी क्षेत्रांतून लेखकाच्या मनातील सर्जक आंदोलने उमटलेली आहेत. ह्या लेखनाला विनोद आणि उपरोधाची किनार आहे, त्यामुळे ह्या कथनसूत्राची गुणवत्ता वाढली आहे. शब्द आणि भाषेवरील प्रभुत्व सिद्ध करत जाणारी ही कहाणी वाचकांसाठीही एक साहसपर्व आहे. ह्या पूर्णतः अनोळखी संदर्भकक्षेत वाचक नकळत स्वानुभवाचे ताणेबाणे शोधायला लागतो, हे ह्या कादंबरीचे बलस्थान आहे.

मूळ जर्मन भाषेतील हेरकुन्फ्ट ही कादंबरी आता मराठीत... पाळंमुळं




**9. पुस्तकाचे नाव : लोकशाहीतला माणूस**

**लेखक : अशोक गोपाळ / अवधूत डोंगरे**

**किंमत : 999/-** **विशेष सवलतीत : 750/-**


न्यू इंडिया फाउंडेशनचा 'कमलादेवी चट्टोपाध्याय ग्रंथ पुरस्कार' (२०२४) विजेतं पुस्तक डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१-१९५६) हे आधुनिक भारतात आदर्शवत मानल्या जाणाऱ्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. १९३०च्या दशकापर्यंत भगवद्गीतेला आदरस्थानी मानून त्यातील अवतरणं वापरणारे आंबेडकर कालांतरानं हिंदू धर्माविरोधात का व कसे गेले? कोलंबिया विद्यापीठात त्यांनी गिरवलेल्या धड्यांचा प्रभाव महाडमध्ये १९२७ साली झालेल्या चवदार तळ्याच्या संघर्षावर आणि १९४०च्या दशकात भारतीय संविधानाच्या मसुदानिर्मितीवर कसा पडला? आपण हिंदू म्हणून मरणार नसल्याचं १९३५ साली जाहीर केलेल्या आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' तयार करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा का केली? एकीकडे व्यक्तिवादाचे कैवारी असणारे आंबेडकर दुसरीकडे बौद्ध धर्मातील सामूहिक नैतिकतेच्या जीवनमार्गावरही श्रद्धा का ठेवत होते? आंबेडकर वसाहतवादाचे समर्थक असल्याचं मानणं चुकीचं का आहे? आंबेडकरांनी मांडलेल्या आणि वापरलेल्या संकल्पनांचे वैचारिक स्रोत कोणते होते? आंबेडकर चळवळीमध्ये व्यग्र असताना त्यांची

पहिली पत्नी रमाबाई यांचं काय झालं? आंबेडकरांसंबंधी शक्य तितके प्रश्न उपस्थित करण्याचा आणि शक्य तितक्या प्रश्नांची उत्तरं देण्याचा काटेकोर प्रयत्न ‘लोकशाहीतला माणूस’ या पुस्तकात करण्यात आला आहे. अशोक गोपाळ यांनी आंबेडकरांचं मराठी व इंग्रजी भाषांमधील लेखन, त्यांची भाषणं व पत्रं यांचं वाचन केलंच; शिवाय, स्वतः आंबेडकरांनी काय वाचलं असेल त्याचंही वाचन केलं. अनेक संदर्भांची पडताळणी करून लिहिलेलं हे पुस्तक आंबेडकरांच्या जीवनचरित्रासोबतच त्यांचा वैचारिक प्रवासही चिकित्सकपणे उलगडून दाखवतं.

## 10.पुस्तकाचे नाव : सप्तमातृका

**लेखक : प्रदीप श. म्हैसेकर**

**किंमत : 300/-** **विशेष सवलतीत : 240/-**




देव आणि देवता मंडळाचा आपण विचार करतो त्यावेळी स्त्री देवतांचा ही विचार करणे अपरिहार्य असते. लक्ष्मी, गौरी, सरस्वती, दुर्गा, चामुंडा या सारख्या स्त्रीदेवतांची सहज स्मृति होते. कारण त्या त्यांचे अस्तित्व जनमानसात आहे; परंतु सप्तमातृका असे म्हटल्यावर यात कोणत्या स्त्री देवतांचा समावेश आहे याची स्मृती सामान्यांस करावीच लागते. सप्तमातृकांची निर्मिती, त्यांचे कार्य आणि कालांतराने त्यांची निर्माण व प्रस्थापित झालेली ओळख हा अभ्यास रंजक तर आहेच पण त्याहून अधिक ज्ञानवर्धक आहे. सप्तमातृकांचा अभ्यास करताना पुरुषप्रधानतेमुळे तर यांचा परिचय मागे तर पडला नाही ना असा प्रश्न मनात लवलवत होताच. खरेतर सप्तमातृकांचे अस्तित्व प्राचीन काळापासून आहे. संस्कृतीचा परिचय याचा अर्थ काही देव-देवता, सण-उत्सव यांचाच परिचय असे असत नाही. महत्त्वपूर्ण देव-देवता यात ज्यांचा ज्यांचा म्हणून समावेश आहे त्या सर्वांचा योग्य परिचय असणे आवश्यक असते. असाच विचार करुन केवळ अभ्यासकांसाठी परिचित असलेल्या या सप्तमातृका सर्वांना परिचित व्हाव्यात यासाठी हा अभ्यास मांडला आहे.

राजहंस पुस्तक पेठ

पत्ता : साई सरस्वती, शिक्षक नगर, गल्ली क्र. ७ च्या सुरवातीस,
परमहंस नगर, वनाज जवळ, पौड रोड, पुणे ४११०३८
संपर्क : ९३२२६३०७०३
rajhanspustakpeth @gmail.com
वेळ : स. १०.३० ते रा. ८.००